जानेवारी २०१७

सत्यमेव जयते

# निवडणूक वार्ता

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

वर्ष: २ रे, अंक: १ ला

## माझं मत...
## माझा आवाज!





बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी मतदार नोंदणीकरिता काढण्यात आलेली प्रचार फेरी




पिंपरी–चिंचवड महानगरपालिका निवडणुकीसाठी मतदार नोंदणीकरिता जनजागृती कार्यक्रम



## मनोगत

राज्य निवडणूक आयोगाची 'निवडणूक वार्ता' ही दरसहा महिन्यांनी प्रकाशित होणारी गृहपत्रिका दुसऱ्या वर्षात पदार्पण करीत आहे. पहिल्या वर्षातील दोन्ही अंकांचे उत्स्फूर्त स्वागत झाले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या झालेल्या निवडणुकांचा आढावा आणि आगामी निवडणुकांच्या पूर्वतयारीची माहिती निवडणूक वार्ताच्या निमित्ताने सर्व संबंधितांपर्यंत पोहोचण्यास मदत होते.

'निवडणूक वार्ता'च्या पहिल्या दोन अंकांबाबत विविध मान्यवरांनी दिलेल्या प्रतिक्रिया आणि सूचनांची दखल घेऊन आता आम्ही तिसरा अंक प्रकाशित करीत आहोत. २१२ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांचा चार टप्प्यांतील कार्यक्रम १७ ऑक्टोबर २०१६ रोजी घोषित करण्यात आला होता. पहिल्या चार टप्प्यांची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. १६ व २१ फेब्रुवारी २०१७ रोजी १० महानगरपालिका, २५ जिल्हापरिषदा आणि २८३ पंचायत समित्यांच्या निवडणुका होणार आहेत. पाठोपाठ आणखी ६ महानगरपालिकांच्या निवडणुका होतील. याचा संक्षिप्त आढावा या अंकात घेतला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अधिक मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याबरोबरच मतदारांचा अधिकाधिक सहभाग वाढावा आणि मतदानाच्या प्रमाणात वाढ व्हावी, यासाठी राज्य निवडणूक आयोगाने विशेष दक्षता घेतली आहे. नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकांमध्ये सर्वांना मतदान करता यावे किंवा मतदार यादीत नावे असलेल्यांच्या तपशिलांत दुरुस्त्या करण्यासाठी ३१ ऑगस्ट २०१६ पर्यंत विशेष मोहीम राबविण्यात आली. त्याचबरोबर अधिकाधिक मतदारांनी मतदान करावे यासाठीदेखील जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली होती. महानगरपालिका, जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी १६ सप्टेंबर ते २१ ऑक्टोबर २०१६ या कालावधीत मतदार नोंदणी मोहीम राबविण्यात आली. मतदार नोंदणीसाठी विविध ठिकाणी प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या लक्षात घेता सकारात्मक परिणाम दिसून आला आहे.

मतदार जागृतीसाठी महाविद्यालये, विद्यापीठे, गृहनिर्माण संस्था, कम्युनिटी रेडिओ आदींच्या माध्यमांतून व्यापक प्रमाणात जनजागृती करण्यात आली. महिंद्रा, फेसबुक, रेडिफ यासारख्या संस्थांनीही मतदार जागृतीसाठी सहकार्य केले. आगामी निवडणुकांच्या वेळी मतदार जागृती मोहीम अधिकाधिक व्यापक करण्याचा आयोगाचा मानस आहे. विशेष म्हणजे आपण सर्वांनी आपापल्या महानगरपालिका, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांमध्ये अवश्य मतदान करावे आणि इतरांनाही प्रोत्साहित करावे, असे मी या निमित्ताने आवाहन करतो.

धन्यवाद!

**ज. स. सहारिया**
राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

# निवडणूक वार्ता

## मार्गदर्शक

**श्री. ज. स. सहारिया**
राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र

## मुख्य संपादक

**श्री. शेखर चन्ने**
सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

## संपादकीय मंडळ

**श्री. ध. मा. कानेड**
उपसचिव

**श्री. अविनाश सणस**
प्रभारी उपायुक्त

**श्री. नि. ज. वागळे**
अवर सचिव

**श्रीमती रीना फणसेकर**
अवर सचिव

**श्रीमती वैशाली चव्हाण**
सहायक आयुक्त

**श्री. तरुणकुमार खत्री**
उपजिल्हाधिकारी

**श्रीमती आरती सरवदे**
तहसीलदार

**श्रीमती मनीषा मोहिते**
तहसीलदार

**श्री. विनोद गोसावी**
तहसीलदार

**श्री. अतुल जाधव**
कक्ष अधिकारी

**श्री. संजय हेंद्रे**
कक्ष अधिकारी

**श्री. संजय सावंत**
कक्ष अधिकारी

**श्रीमती रत्नप्रभा बेले**
कक्ष अधिकारी

**श्रीमती प्रणाली घोंगे**
सहाय्यक आयुक्त

**श्रीमती राजेश्वरी देशपांडे**
लेखा अधिकारी

**श्रीमती मनीषा माने**
सांख्यिकी अधिकारी

## कार्यकारी संपादक

**श्री. जगदीश मोरे,**
जनसंपर्क अधिकारी

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| राजकीय पक्षांसोबत विचारविनिमय | / ०५ |
| राजकीय पक्ष नोंदणी | / ०६ |
| निवडणूक खर्च असा करावा सादर | / ०७ |
| स्वेच्छा निधी वापराबाबत | / ०८ |
| वरिष्ठ अधिकाऱ्यांची कार्यशाळा | / ०९ |
| मागोवा नगरपरिषद, नगरपंचायत निवडणुकांचा | / १० |
| रणधुमाळी निवडणुकांची (फेब्रुवारी २०१७) | / १३ |
| आयोगाचा प्रथमच चित्ररथ | / १५ |
| सर्वांसाठी ॲप | / १६ |
| माझं मत... माझा आवाज! | / १७ |
| आचारसंहितेचे सुधारीत आदेश | / २० |
| महानगरपालिका निवडणूक २०१७ : जागांचा तपशील | / २१ |
| २०१२ च्या महानगरपालिका निवडणुकांचा तपशील | / २२ |
| २०१२ च्या महानगरपालिका निवडणुकांचे निकाल | / २३ |
| जि. प. आणि पं. स. निवडणुकांचा तपशील | / २४ |
| २०१२ च्या जिल्हा परिषद निवडणुकांचे निकाल | / २५ |
| २०१२ च्या पंचायत समिती निवडणुकांचे निकाल | / २६ |


'निवडणूक वार्ता' ही सहामाही गृहपत्रिका आहे. तपशीलवार माहितीसाठी संबंधित कायद्यातील तरतुदी किंवा आयोगाचे आदेश पाहावेत.

**प्रकाशक :** राज्य निवडणूक आयोग, पहिला मजला, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई-३२.
**मांडणी आणि मुद्रक :** ऑर्बिट प्रमोशन्स, मुंबई-०१ । **संपर्क :** ०२२-२२७०००१७/१८
**वर्ष: २ रे, अंक : १ ला,** SEC/P.N.19/2017-1/News Letter-3

# राजकीय पक्षांसोबत विचारविनिमय

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांची तयारी आणि मतदार नोंदणीबाबत विचारविनिमय करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या मा. राज्य निवडणूक आयुक्त श्री. ज. स. सहारिया यांच्या उपस्थितीत चार बैठका घेण्यात आल्या.

मुदत संपणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांबाबत उपस्थित प्रतिनिधींना अवगत करण्यात आले; तसेच महानगरपालिका (बृहन्मुंबई वगळून) व नगरपरिषदांच्या निवडणुकांसाठीची बहुसदस्यीय पद्धत, नगरपरिषदेच्या अध्यक्षांची मतदारांमधून थेट निवड, मतदार नोंदणी, नामनिर्देशनपत्रे व शपथपत्रे संगणकीय प्रणालीद्वारे सादर करण्याची सुविधा,राजकीय पक्ष व उमेदवारांनी विहित मुदतीत खर्च सादर करणे, आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भातील संशोधन आदी मुद्द्यांवर या बैठकांमध्ये सविस्तर चर्चा झाली.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रभागनिहाय मतदार यादीमध्येदेखील विधानसभा मतदारसंघ क्रमांक, यादी भाग क्रमांक व त्यातील अनुक्रमांक कायम ठेवावा, मतदार यादीवरील हरकती व सूचनांचा कालावधी वाढविण्यात यावा, मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक मीडियामध्ये जाहिरात प्रसिद्धी करण्याबाबत समान नियम असावेत, नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी स्टार प्रचारकांच्या संख्येची मर्यादा वाढविण्यात यावी आदीं विविध सूचना उपस्थित राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी यावेळी केल्या.

राजकीय प्रतिनिधींच्या सूचनांचा अभ्यास करून त्या अंमलात आणण्याबाबत यथायोग्य कार्यवाही करण्यात येईल, असे मा. राज्य निवडणूक आयुक्त यांनी यावेळी सांगितले.

## ■ राजकीय पक्षांसोबतच्या बैठकांच्या तारखा

**१६ जुलै २०१६ | २९ जुलै २०१६ | २४ ऑक्टोबर २०१६ | ०८ नोव्हेंबर २०१६**



# राजकीय पक्ष नोंदणी

ग्रामपंचायती वगळून अन्य सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका राजकीय पक्षांच्या चिन्हांवर लढविल्या जातात. भारत निवडणूक आयोगाकडील मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना त्यांच्यासाठी आरक्षित असलेले चिन्ह मिळविण्यासाठी; तसेच भारत निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत राजकीय पक्षांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये चिन्ह वाटपात प्राधान्य मिळविण्याकरिता राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे.

मान्यताप्राप्त पक्षांचे चिन्ह भारत निवडणूक आयोगाकडून निश्चित केले जाते. अशा पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केल्यास त्यांच्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत तेच चिन्ह आरक्षित केले जाते. राज्य निवडणूक आयोगाकडील अन्य नोंदणीकृत राजकीय पक्षांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत चिन्ह वाटपात प्राधान्य दिले जाते.

## एकूण २२० पक्षांची नोंदणी रद्द

राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत सर्व राजकीय पक्षांनी दरवर्षी आयकर विवरणपत्र आणि लेखापरीक्षित लेख्याची प्रत राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करणे आवश्यक असते. याची पूर्तता न करणाऱ्या एकूण २२० राजकीय पक्षांची विविध टप्प्यांत राज्य निवडणूक आयोगाने नोंदणी रद्द केली आहे. ही कारवाई सन २०१३ पर्यंत नोंदणीकृत झालेल्या पक्षांवर करण्यात आली आहे. नोंदणी रद्द केलेल्या राजकीय पक्षांनी ३१ डिसेंबर २०१६ पर्यंत एक लाख रुपये दंड भरून कागदपत्रांची पूर्तता केल्यास त्यांची नोंदणी पूर्ववत करण्याची त्यांना शेवटची संधीही देण्यात आली होती. निवडणूक लढविण्यापासून कोणाला वंचित करणे, हा दंड करण्याचा उद्देश नाही; परंतु निवडणुकीचे गांभीर्य आणि शिस्त कायम ठेवणे आवश्यक आहे.



# निवडणूक खर्च असा करावा सादर

निवडणुकांमध्ये अवैध मार्गाने होणाऱ्या खर्चाला आळा घालण्याकरिता सातत्याने उपाययोजना करण्यात येत असतात. त्याचाच एक भाग म्हणून राज्य निवडणूक आयोगाने १५ ऑक्टोबर २०१६ रोजी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या निवडणूक खर्चाचा हिशोब देण्याबाबत आदेश काढले आहेत.


## सर्व उमेदवारांसाठी

खर्चासंदर्भातील आदेशान्वये सर्व उमेदवारांनी शेड्युल्ड बँकेत स्वतंत्र खाते उघडणे आवश्यक आहे. त्या खात्याचा तपशील नामनिर्देशनपत्र दाखल करताना निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे देणे आवश्यक आहे. याच खात्यामधून उमेदवारांनी निवडणुकीसाठीचे आर्थिक व्यवहार करणे बंधनकारक आहे.

उमेदवाराने नामनिर्देशनपत्र भरल्यापासून निकालापर्यंतच्या दैनंदिन खर्चाचा तपशील दुसऱ्या दिवशी दुपारी २.०० वाजेपर्यंत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सादर करणे आवश्यक आहे. एकूण खर्चाचा तपशील निकाल लागल्यानंतर ३० दिवसांच्या आत संबंधित जिल्हाधिकारी किंवा महानगरपालिका आयुक्ताकडे सादर करावा लागतो.

उमेदवाराने अथवा त्याच्या प्रतिनिधीने स्वत: केलेला खर्च, राजकीय पक्षाने त्याच्यावर केलेला खर्च व इतर व्यक्तींनी त्याच्यावर केलेल्या खर्चाचा एकूण निवडणूक खर्चामध्ये समावेश करणे उमेदवारास बंधनकारक आहे. आयोगाने निश्चित केलेली वेळ व रित प्रमाणे खर्च सादर न केल्यास उमेदवारास संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिनियमातील तरतुदीनुसार अनर्ह करण्याबाबतची कार्यवाही केली जाते.

## सर्व राजकीय पक्षांसाठी




स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी सर्व राजकीय पक्षांनी शेड्युल्ड बँकेमध्ये स्वतंत्र खाते उघडणे आवश्यक आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी याच खात्यातून राजकीय पक्षांनी व्यवहार करणे आवश्यक आहे. राजकीय पक्षांना निकाल लागल्यानंतर २० दिवसांच्या आत विशिष्ट उमेदवारांवर केलेला थेट खर्च आणि उमेदवारांमध्ये विभाजित करता येणारा खर्च संबंधित जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्ता मार्फत राज्य निवडणूक आयोगास सादर करणे आवश्यक आहे. निवडणूक खर्चासाठी स्वीकारलेला निधी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनिहाय एकूण खर्चाचा तपशील निकाल लागल्यानंतर ६० दिवसांच्या आत सादर करणे आवश्यक आहे.

प्रत्येक राजकीय पक्षांना राजकीय पक्ष नोंदणी आदेश, २००४ व २००९ अन्वये दरवर्षी विवरणपत्र भरल्याची आणि लेखापरीक्षित लेख्याची प्रत सादर करणे आवश्यक आहे. आयोगाने निश्चित केलेली वेळ व रितप्रमाणे खर्च सादर न केल्यास संबंधित पक्षांची नोंदणी निलंबित किंवा रद्द करणे, विलंबाकरिता प्रती दिवस आर्थिक दंड करणे किंवा राजकीय पक्ष नोंदणी आदेश, २००९ व निवडणूक खर्चांसंदर्भातील १५ ऑक्टोबर २०१६च्या आदेशातील तरतुदींनुसार कारवाई केली जाईल.

# स्वेच्छा निधी वापराबाबत

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रात निवडणुकांच्या तोंडावर स्वेच्छा निधीतून (Discretionary Fund) खर्च न करण्यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने ०५ ऑक्टोबर २०१६ रोजी आदेश निर्गमित केला आहे.

या आदेशान्वये स्थानिक स्वराज्य संस्थेची मुदत संपण्याच्या तीन महिने आधीपासून किंवा निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून, यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापासून संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात लोकप्रतिनिधींना आपल्या स्वेच्छा निधीतून खर्च करता येणार नाही.

## निवडणुकीच्या पूर्वसंध्येमध्ये मतदारांवरील प्रभाव टाळण्यासाठी

भारत सरकारच्या दि.२८ ऑगस्ट १९६९ च्या मार्गदर्शक सूचना आणि त्यावरील मा. उच्च न्यायालयाचे आदेश लक्षात घेऊन हे निर्बंध घालण्यात आले आहेत. स्वेच्छा निधीचा निवडणुकीच्या पूर्वसंध्येस वापर करून मतदारांवरील प्रभाव टाकण्याच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी ही उपाययोजना करण्यात आली आहे.

संबंधित ठिकाणी स्वेच्छा निधी खर्च करण्याचे निर्बंध लागू होणाऱ्या दिनांकाबाबतचे आदेश संबंधित जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका आयुक्तांनी निर्गमित करावे, असे आदेशात नमूद केले आहे. निर्बंध लागू झाल्यानंतर कोणत्याही लोकप्रतिनिधींना स्वेच्छा निधीतून करावयाच्या कामाचे प्रस्ताव संबंधित अधिकाऱ्यांकडे सादर करता येणार नाहीत.

## जुन्या कामांवर निर्बंध नाहीत

निर्बंधाच्या दिनांकापूर्वी प्रस्ताव मंजूर असला आणि प्रत्यक्ष कामास सुरूवात झाली नसल्यास कार्यारंभ आदेश देता येणार नाही किंवा कामास सुरूवात करता येणार नाही. निर्बंधाच्या दिनांकापूर्वी कामास सुरूवात झाली असल्यास ते काम पुढे सुरू ठेवता येईल. निर्बंध न पाळल्यास कामास स्थगिती देण्यात येईल व संबंधित अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्यात येईल, असेही आदेशात नमूद केले आहे.



# वरिष्ठ अधिकाऱ्यांची कार्यशाळा

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगातर्फे सह्याद्री अतिथीगृह येथे २६ ऑक्टोबर २०१६ रोजी मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या प्रमुख उपस्थितीत राज्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

राज्याचे मुख्य सचिव, स्वाधीन क्षत्रिय, गृह विभागाचे तत्कालीन अपर मुख्य सचिव के. पी. बक्षी, मुख्य राजशिष्टाचार अधिकारी सुमित मल्लिक, पोलीस महासंचालक सतीश माथूर, बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त अजॉय मेहता, मुंबईचे पोलीस आयुक्त डी. डी. पडसलगीकर, आयोगाचे सचिव शेखर चन्ने, विविध विभागांचे सचिव, विभागीय आयुक्त, महानगरपालिका आयुक्त, विशेष पोलीस महानिरीक्षक, पोलीस आयुक्त आदींसह आयकर विभाग, राज्य उत्पादन शुल्क, विक्रीकर विभाग व राज्यस्तरीय बँकर्स समितीचे वरिष्ठ अधिकारी कार्यशाळेस उपस्थित होते.

श्री. क्षत्रिय यांनी सांगितले की, न्यायालयांचे विविध निर्देश, कायद्यातील तरतुदी आणि आयोगाच्या आदेशांप्रमाणे संपूर्ण यंत्रणेने कार्यवाही करावी.

श्री. मल्लिक यांनी सांगितले की, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अभिप्रायानुसार राज्य निवडणूक आयोग स्वतंत्र आणि भारत निवडणूक आयोगाशी समकक्ष आहे. आयोगाच्या सूचनांचे आणि आदेशांचे पालन करणे संबंधितांना बंधनकारक आहे.

श्री. माथूर म्हणाले की, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस दलातर्फे आवश्यक त्या सर्व उपाययोजना केल्या जातील.

कुख्यात गुन्हेगारांची यादी करणे, अवैध शस्त्रे जमा करणे, भरारी पथके नियुक्ती करणे, नाका तपासणी करणे आदी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. सोशल मीडियावरील अफवा अथवा अनुचित स्वरूपातील मजकुरावरही (पोस्ट) बारकाईने लक्ष ठेवावे व त्याला वेळीच आळा घालावा. बँका व आयकर विभागाच्या मदतीने रोख रकमांच्या व्यवहारावर लक्ष ठेवतानाच बस स्थानके, रेल्वे स्थानके, विमानतळ आदी ठिकाणांबाबतही सतर्कता बाळगावी

**श्री. ज. स. सहारिया,**
राज्य निवडणूक आयुक्त



# मागोवा नगरपरिषद, नगरपंचायत निवडणुकांचा

राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील १९२ नगरपरिषदा व २० नगरपंचायतींच्या (एकूण २१२) सार्वत्रिक निवडणुका चार टप्प्यांत घेण्यात येणार असल्याची घोषणा १७ ऑक्टोबर २०१६ रोजी केली होती. त्यानुसार २७ नोव्हेंबर, १४ व १८ डिसेंबर २०१६; तसेच ८ जानेवारी २०१७ रोजी चार टप्प्यांतील निवडणुका पार पडल्या आहेत. त्यात नगरपरिषदेच्या थेट नगराध्यक्षपदाच्या निवडणुकांचाही समावेश होता.

## निगभीड व पनवेल वगळले

आयोगाच्या प्रभाग रचनेच्या कार्यक्रमानुसार २१४ नगरपरिषदा व नगरपंचायतींची १६ ऑगस्ट २०१६ रोजी अंतिम प्रभाग रचना जाहीर करण्यात आली होती. त्यानंतर आयोगाने ३० ऑगस्ट २०१६ च्या पत्रान्वये प्रभागनिहाय मतदार यादी तयार करण्याचा दोन टप्प्यांतील कार्यक्रमही दिला होता. पहिल्या टप्प्यात १५ ऑक्टोबर २०१६ रोजी १६९ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या; तर दुसऱ्या टप्प्यात २९ ऑक्टोबर २०१६ रोजी ४५ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या मतदार याद्या अंतिम करण्यात आल्या. यात नागभीड (जि. चंद्रपूर) व पनवेल (जि. रायगड) नगरपरिषदेचाही समावेश होता; परंतु त्यानंतर नागभीड नगरपरिषदेचे प्रकरण न्यायप्रविष्ठ झाले आणि पनवेल नगरपरिषदेचे महानगरपालिकेत रुपांतर करण्यात आले. त्यामुळे २१४ ऐवजी प्रत्यक्षात २१२ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांची घोषणा करण्यात आली.

## वैजापूर व शिराळ्यात मतदान प्रक्रिया नाही

नवनिर्मित शिराळा नगरपंचायतीसाठी एकही नामनिर्देशनपत्र प्राप्त झाले नाही; तसेच औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर नगरपरिषदेच्या निवडणूक प्रक्रियेस न्यायालयाने स्थगिती दिली आहे. परिणामी या दोन ठिकाणी निवडणूक प्रकिया पूर्ण होऊ शकली नाही. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यावर दबाव आणल्याच्या प्रकरणी देसाईगंज नगरपरिषदेच्या प्रभाग क्र.९ मधील जागा क्र.९-ब ची निवडणूक प्रक्रिया आयोगाने स्थगित केली आहे. सुधारीत कार्यक्रमानुसार आता या एका जागेसाठी २२ जानेवारी २०१७ रोजी मतदान होणार आहे.

## नगरपरिषद व नगरपंचायतींच्या सदस्यपदाच्या निवडणुकांचे टप्पेनिहाय निकाल- २०१६

| टप्पा क्र. | दिनांक | नगरपरिषद/नगर पंचायतींची संख्या | एकूण प्रभाग | एकूण जागा | जाहीर निकाल | भारतीय जनता पार्टी | समाजवादी पार्टी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पहिला टप्पा | मतदान २७.११.२०१६<br>निकाल २८.११.२०१६ | १६४ | १९६८ | ३७३२ | ३७२९ | ८९५ | ० |
| दुसरा टप्पा | मतदान १४.१२.२०१६<br>निकाल १५.१२.२०१६ | १४ | १५८ | ३२४ | ३२४ | ८१ | ० |
| तिसरा टप्पा | मतदान १८.१२.२०१६<br>निकाल १९.१२.२०१६ | २१ | २१३ | ४१० | ४०९ | ११६ | १ |
| चौथा टप्पा | मतदान ०८.०१.२०१७<br>निकाल ०९.०१.२०१७ | ११ | ११८ | २४४ | २४४ | १०० | ० |
| | एकूण | २१० | २४५७ | ४७१० | * ४७०६ | ११९२ | १ |

## स्टार प्रचारकांच्या संख्येत वाढ

राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी झालेल्या सर्व राजकीय पक्षांना नगरपरिषद व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकासाठी' महत्त्वाच्या प्रचारकांची' (Star Campaigner) संख्या वाढविण्यात आली आहे. भारत निवडणूक आयोगाकडून मान्यताप्राप्त (राष्ट्रीय, राज्यस्तरीय व इतर राज्यस्तरीय एकूण १५ पक्ष) पक्षांसाठी ४०; तर इतर पक्षांसाठीही संख्या २० करण्यात आली आहे.

## नामनिर्देशनपत्रांसाठी संगणकीय प्रणाली

नगरपरिषदा व नगरपंचायती निवडणुकांसाठी नामनिर्देशनपत्रे व शपथपत्रे संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. पहिल्या टप्प्यातील १६४ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकीत सुमारे ७० टक्के नामनिर्देशनपत्रे व शपथपत्रे संगणकीय प्रणालीद्वारे प्राप्त झाली होती. उर्वरित तिन्ही टप्प्यांतील नगरपरिषदा व नगरपंचायतींसाठी सर्व म्हणजे १०० टक्के नामनिर्देशनपत्रे संगणकीय प्रणालीद्वारे प्राप्त झाली.

## शपथपत्रांना प्रसिद्धी

दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या टप्प्यातील नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांतील उमेदवारांनी दाखल केलेल्या शपथपत्रांना वृत्तपत्रांच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर व्यापक प्रसिद्धी देण्यात आली; तसेच मतदान केंद्राबाहेरही उमेदवारांनी शपथपत्रांत नमूद केलेला तपशील संक्षिप्त स्वरुपात फलकावर लावण्यात आला होता.

**नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकांचे टप्पेनिहाय निकाल– २०१६**

| टप्पा क्रमांक | नगराध्यक्ष पदांची संख्या | भारतीय जनता पार्टी | नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी | इंडियन नॅशनल काँग्रेस | शिवसेना | अपक्ष | आघाडी/फ्रंट | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पहिला टप्पा | १४७ | ५१ | १८ | २३ | २५ | १२ | १३ | ५ |
| दुसरा टप्पा | १४ | ५ | २ | २ | १ | १ | ३ | ० |
| तिसरा टप्पा | १९ | ८ | १ | ८ | ० | २ | ० | ० |
| चौथा टप्पा | ११ | ७ | ० | २ | ० | ० | २ | ० |
| एकूण | १९१ | ७१ | २१ | ३५ | २६ | १५ | १८ | ५ |

(* मुरुड–जंजिरा, मेढा व दुधनी येथे प्रत्येकी एका जागेसाठी नामनिर्देशन पात्र प्राप्त झाले नाही. देसाईगंज येथील एका जागेची निवडणूक प्रक्रिया पुढे ढकलली.)

| नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी | इंडियन नॅशनल काँग्रेस | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सिस्ट) | बहुजन समाज पार्टी | शिवसेना | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्ष | राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत पक्ष | अपक्ष | आघाडी/फ्रंट |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६१५ | ७२७ | १२ | ९ | ५२९ | ७ | ६९ | ३८५ | ४५९ | २२ |
| ९३ | ४५ | ० | ० | २३ | ० | ७ | ३३ | ३० | १२ |
| ७८ | १२२ | ० | २ | ४६ | ० | ६ | ६ | २८ | ४ |
| २६ | ५८ | ० | ६ | १४ | ० | १ | २७ | ७ | ५ |
| ८१२ | ९५२ | १२ | १७ | ६१२ | ७ | ८३ | ४५१ | ५२४ | ४३ |

## ■ महत्त्वपूर्ण उपाययोजना

● व्हिडिओग्राफी सर्व्हेलियन्स पथक ● भरारी पथक ● चेक पोष्टसाठी पथक ● तक्रार निवारण कक्ष
● निवडणूक निरीक्षकांची नियुक्ती ● मतदार जागृती अभियान ● मतदारांना व्होटर स्लीपचे वाटप

## ■ नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांवर एक दृष्टिक्षेप

- मुदत संपणाऱ्या १९० नगरपरिषदा व ४ नगरपंचायती
- नवनिर्मित २ नगरपरिषदा व १६ नगरपंचायती
- नगरपरिषदेच्या १९१ थेट अध्यक्षपदासाठी निवडणूक
- एकूण प्रभाग २,४८५
- एकूण जागा ४,७५०
- महिलांसाठी आरक्षित जागा २,४४५
- अनुसूचित जातींसाठी एकूण आरक्षित जागा ६०८
- अनुसूचित जमातींसाठी आरक्षित जागा १९८
- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी एकूण आरक्षित जागा १,३१५

**नगरपरिषद व नागरपंचायत निवडणुकांचा टप्पेनिहाय तपशील**

| जिल्ह्यांची संख्या | नगरपरिषद, नगरपंचायत संख्या | मतदानाचा दिनांक | मतमोजणीचा दिनांक | मतदानाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| २५ | १४७ नगरपरिषदा व १८ नगरपंचायती | २७ नोव्हेंबर २०१६ | २८ नोव्हेंबर २०१६ | ७०.०० |
| २ | १४ नगरपरिषदा | १४ डिसेंबर २०१६ | १५ डिसेंबर २०१६ | ७२.१८ |
| ४ | २० नगरपरिषदा व २ नगरपंचायती | १८ डिसेंबर २०१६ | १९ डिसेंबर २०१६ | ७२.७३ |
| २ | ११ नगरपरिषदा | ८ जानेवारी २०१७ | ९ जानेवारी २०१७ | ६७.३६ |

## ■ निवडणूक प्रक्रियेचा प्रत्यक्ष आढावा

मा. राज्य निवडणूक आयुक्त व सचिव यांनी प्रत्यक्ष भेटी देऊन विभागीय व जिल्हा स्तरावर नगरपरिषद व नगरपंचायत निवडणूक प्रक्रियेचा प्रत्यक्ष आढावा घेतला. जळगाव, उस्मानाबाद, सातारा व अलिबाग येथे विभागस्तरीय आढावा बैठका घेण्यात आल्या. नांदेड व नागपूर येथेही मा. आयुक्त यांनी आढावा बैठका घेतल्या. याशिवाय सर्व जिल्ह्यांतील सबंधित निवडणूक अधिकाऱ्यांशी वेळोवेळी संवादही साधण्यात आला.



# रणधुमाळी निवडणुकांची (फेब्रुवारी २०१७)

मा. राज्य निवडणूक आयुक्त श्री. ज. स. सहारिया यांनी १० महानगरपालिका, २५ जिल्हा परिषदा व २८३ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांची ११ जानेवारी २०१७ रोजी घोषणा केली आहे. त्यानुसार १६ व २१ फेब्रुवारी २०१७ रोजी मतदान होईल.

## ■ १६ फेब्रुवारी २०१७ रोजी या जि. प. व त्यांतर्गच्या पं.स. साठी मतदान

जळगाव, अहमदनगर, औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, बुलडाणा, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर व गडचिरोलीजिल्ह्यातील ८ पंचायत समित्या व त्यातील निवडणूक विभाग. (या जिल्हा परिषदांतर्गतच्या एकूण १६५ पंचायत समित्या)

## ■ २१ फेब्रुवारी २०१७ रोजी या जि. प. व त्यांतर्गच्या पं.स.साठी मतदान

रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, सांगली, कोल्हापूर, पुणे, सोलापूर, नाशिक, अमरावती व गडचिरोली जिल्ह्यातील ४ पंचायत समित्या व त्यातील निवडणूक विभाग (या जिल्हा परिषदांतर्गतच्या एकूण ११८ पंचायत समित्या)

## ■ २१ फेब्रुवारी २०१७ रोजी या महानगरपालिकांसाठी मतदान

बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, नाशिक, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, अकोला, अमरावती व नागपूर.

## ■ महानगरपालिका प्रभाग रचना

बृहन्मुंबई महानगरपालिकेची सदस्य संख्या मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मध्ये २२७ एवढी निश्चित आहे. उर्वरित ९ महानगरपालिकांसाठी सन २०११च्या जनगणनेवर आधारित लोकसंख्येनुसार सदस्य संख्या निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार अंतिम प्रभाग रचना २५ नोव्हेंबर २०१६ रोजी शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली.

पाठोपाठ होणाऱ्या भिवंडी-निजामपूर, मालेगाव, लातूर, परभणी, चंद्रपूर आणि पनवेल महानगरपालिकांच्या प्रभाग रचनेचा देखील कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यांची अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना१५ फेब्रुवारी २०१७ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे.

### नागपूर जि.प. व पं.स. वगळल्या

नागपूर जिल्हा परिषद व त्याअंतर्गतच्या पंचायत समित्यांच्या निवडणुकांना मा. उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. त्यामुळे त्यांचा या कार्यक्रमात समावेश केलेला नाही; तसेच अन्य काही याचिकाही दाखल झाल्या आहेत. या याचिकांवरील निर्णयाच्या अधिन राहून हा निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

## ■ जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांची प्रभाग रचना

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत लोकसंख्येनुसार सदस्य संख्या निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हा परिषद क्षेत्राची निवडणूक विभागांमध्ये; तर पंचायत समिती क्षेत्राची निर्वाचक गणांमध्ये (प्रभाग रचना) विभागणी करण्यात आली आहे.

## मतदार यादी २१ जानेवारीला

भारत निवडणूक आयोगाकडून १ जानेवारी २०१७ या अर्हता दिनांकावर आधारीत विधानसभा मतदार संघाची मतदार यादी ५ जानेवारी २०१७ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे. हीच यादी १६ व २१ फेब्रुवारी २०१७ रोजी मध्ये होणाऱ्या महानगरपालिका, जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी वापरली जाणार आहे. या यादीचे प्रभागनिहाय विभाजन करून त्यावर १२ ते १७ जानेवारी २०१७ या कालावधीत हरकती व सूचना मागविल्या जाणार आहेत. प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी २१ जानेवारी २०१७ रोजी प्रसिद्ध होईल.

## ...याच दुरुस्त्या शक्य

विधानसभा मतदारसंघाच्या मतदार यादीत मतदार म्हणून नावाचा समावेश करण्यासाठी २१ ऑक्टोबर २०१६ पर्यंत अर्ज केलेल्या व त्यापैकी भारत निवडणूक आयोगाने मंजूर केलेल्या नावांचाच महानगरपालिका, जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या मतदार यादीत समावेश असेल. विधानसभेच्या मूळ मतदार यादीत कोणत्याही दुरूस्त्या केल्या जाणार नाहीत. विधानसभा मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन करताना झालेल्या चुकाच केवळ दुरूस्त करता येतील.

## संशोधन

निवडणुकांसंदर्भात संशोधन करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने विविध विद्यापीठे आणि नामांकित संस्थांना आवाहन केले होते. त्यास प्रतिसाद देऊन मुंबई विद्यापीठ व पुणे येथील गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्सने विविध विषयांबाबत संशोधन केले आहे. गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्सने अलीकडेच 'मतदारांना कसा स्वरुपाचा उमेदवार हवा आहे', 'आचारसंहितेसंदर्भातील मतदारांचा दृष्टीकोन', 'निवडणुकीत आर्थिक बळाचा वापर'आदी विषयांवर संशोधन केले आहे.

## अधिकारी, कर्मचारी प्रशिक्षण

निवडणूक प्रक्रियेसंदर्भात विविध टप्प्यांवर अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येते. नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी प्रशिक्षणांचे आयोजन करण्यात आले होते. आगामी निवडणुकांसाठीदेखील प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येईल. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुका इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे घेतल्या जातात. या यंत्रांच्या देखभालीपासून त्यांच्या वापरापर्यंतचे विविध प्रकारचे प्रशिक्षणही सध्या देण्यात येत आहे.



# आयोगाचा प्रथमच चित्ररथ

मुंबई येथील शिवाजी पार्कवर २६ जानेवारी २०१७ रोजी प्रजासत्ताक दिनी होणाऱ्या संचलनात प्रथमच राज्य निवडणूक आयोगाच्या चित्ररथाचा समावेश करण्यात येणार आहे. या चित्ररथाच्या प्रतिकृतीचे राज्य निवडणूक आयुक्त श्री. ज.स.सहारिया यांच्या हस्ते २८ डिसेंबर २०१६ रोजी अनावरण करण्यात आले.

भारतीय राज्य घटनेतील ७३ आणि ७४ व्या दुरुस्तीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक बळकटी प्राप्त झाली आणि त्यानंतर राज्य निवडणूक आयोगाचीही स्थापना करण्यात आली. या घटना दुरुस्तीला २५ वर्ष होत असल्याच्या पार्श्वभूमीवर आणि १० महानगरपालिका, २६ जिल्हापरिषदा व २९६ पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी मतदार जागृतीच्या उद्देशाने चित्ररथ तयार करण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे.

चित्ररथाचे संकल्पना चित्र सर ज.जी.कला महाविद्यालयाचे असून तेच त्याची संपूर्ण निर्मितीही करणार आहेत. चित्ररथाच्या प्रथम दर्शनी भागावर उडत्या श्वेत अश्वाचे शिल्प असेल. ते भारताचे राष्ट्रीय चिन्ह असलेल्या अशोक स्तंभारून घेतले आहे. चित्ररथाच्या मध्यभागी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इमारती प्रातिनिधिक स्वरूपात दर्शविल्या जातील. चित्ररथावर मतदारांना मतदानासाठी आवाहन करणारा जिवंत देखावाही असेल. मागील बाजूस एलईडी पडदा असेल. त्यावर मतदार जागृतीसंदर्भातील घोषवाक्य, पोस्टर्स, चित्रे व ध्वनिचित्रफिती दाखविण्यात येतील.

## मुंबईसह ठाण्यात चित्ररथ द्वारे मतदार जागृती

राज्य निवडणूक आयोगाने प्रजासत्ताक दिनानिमित्त चित्ररथ तयार केला असला तरीही व्यापक हेतूने मतदार जागृती साठी हा चित्ररथ मुंबईत आणि ठाणे शहरात ठिकठिकाणी फिरविण्यात येणार आहे. मुंबई आणि ठाणे महानगरपालिका निवडणुकीसाठी २१ फेब्रुवारी २०१७ रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकांमध्ये मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी या उपक्रमाचा हातभार लाभू शकतो.



# सर्वांसाठी 'ॲप'

राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक प्रक्रियेसाठी अधिकाधिक संगणकीय व अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यास सुरुवात केली आहे. प्रभाग रचना व मतदार याद्याच्या विभाजनासाठी वेगवेगळ्या संगणकीय प्रणालीचा वापर केला जात आहे. आयोगाने आता 'ट्रू व्होटर' आणि 'कॉप' हे दोन मोबाईल ॲप विकसित केले आहेत.

## ट्रू व्होटर

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भातील सुविधा, माहिती व सहाय्य तातडीने उपलब्ध व्हावे यादृष्टीने आयोगाने 'ट्रू व्होटर' ॲप विकसित केले आहे. या ॲप च्या माध्यमातून मतदारांना मतदार यादीतील आपले नाव व मतदान केंद्र शोधता येईल. मतदान केंद्रावर जाण्यासाठी गुगल मॅपद्वारे मार्गक्रमण करता येईल. उमेदवाराने शपथपत्रांमध्ये भरलेली माहिती मतदारांना पहाता येईल. उमेदवारांनी दाखल केलेला निवडणूक खर्च पहाता येईल. निवडणुकीचा निकालही मिळू शकेल.

ॲपद्वारे उमेदवारांना आपले प्रोफाईल तयार करता येईल. उमेदवारांना सुटसुटीतपणे दैनंदिन खर्च नोंदविता येईल. ॲपमधून नमुना-१, २ व ३ पीडीएफ स्वरुपात प्राप्त करुन ते निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना सादर करणेदेखील शक्य होईल. निवडणुकीशी संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी मतदार यादी बनविणे, मतदान केंद्रांचा नकाशा तयार करणे. महत्त्वाचे अहवाल सादर करणे, मतदानाची आकडेवारी देणे, तातडीच्या परिस्थितीमध्ये अलार्म पाठविणे इ. सुविधाही देण्यात आल्या आहेत.

नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकांमध्ये या ॲपचा वापर करण्यात आला आहे. सुमारे ४८ हजार जणांनी हे ॲप डाऊनलोड केले आहे. महानगरपालिका, जिल्हापरिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांमध्ये या ॲपचा अधिक प्रभावी वापर करण्यात येणार आहे.

## कॉप

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांमध्ये 'कॉप'(Citizens On Patrol ) या ॲपचा वापर केला जाणार आहे. असोशिएशन फॉर डेमोक्रेटिक रिफॉर्म्सच्या (ADR)सहकार्याने हे ॲप विकसित करण्यात आले आहे. या ॲपच्या नावातच 'सिटीझन ऑन पेट्रोल' म्हणजे जनतेची नजर किंवा गस्त असा आशय सामावलेला आहे.

या ॲपच्या माध्यमातून सर्वसामान्य मतदारही निवडणूक प्रक्रियेवर नजर ठेऊ शकतील. आचारसंहिता भंगाच्या तक्रारी अत्यंत सुलभ पद्धतीने करता येऊ शकतील. प्रचाराच्या कालावधीत काही गैरप्रकार आढळल्यास छायाचित्रासह तो ॲपद्वारे तात्काळ निवडणूक यंत्रणांच्या निदर्शनास आणून देता येईल. त्यानंतर निवडणूक संनियंत्रण समिती त्या आधारे कार्यवाही करेल.

या ॲपच्या माध्यमातून तक्रार करणाऱ्याचा मोबाईल क्रमांक गोपनीय ठेवला जाईल. आयोगाने हे ॲप नागपूर व गोंदिया जिल्ह्यातील ११ नगरपरिषदांच्या निवडणुकांसाठी उपलब्ध करून दिले होते. आतापर्यंत १५५ अधिकाऱ्यांची त्याद्वारे नोंद झाली असून ३२८ नागरीकांनी ते डाऊनलोड केले आहे.

# माझं मत.... माझा आवाज!

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या दृष्टीने गेल्या सुमारे दीड वर्षांपासून राज्य निवडणूक आयोग मतदार जागृती मोहीम राबवित आहे. या मोहिमेचे प्रामुख्याने मतदार नोंदणी (Voter Registration), मतदानाचे प्रमाण वाढविणे (Voter Turnout) नैतिकतापूर्ण मतदान (Ethical Voting) असे तीन भाग आहेत.

भारत निवडणूक आयोगाकडून तयार करण्यात येणारी विधानसभा मतदार संघाचीच मतदार यादी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी वापरली जाते. विधानसभा मतदार संघाच्या मतदार यादीचे अद्ययावतीकरण सुरू असताना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्तरावर मतदार जागृती मोहीम हाती घेण्यात आली आहे. त्याचबरोबर मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी आणि नैतिकतापूर्ण मतदानासाठी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रत्यक्ष निवडणुकांच्या वेळेस मतदार जागृती करण्यात आली आणि आताही करण्यात येणार आहे.

## मतदार जागृती मोहिमेच्या ठळक नोंदी

- पारंपरिक पद्धतीबरोबरच नावीन्यपूर्ण पद्धतीचाही अवलंब
- विद्यापीठे व महाविद्यालयांचा मतदार जागृतीत सक्रीय सहभाग
- विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी मतदार नोंदणीची व्यवस्था
- मान्यवर व्यक्तींच्या माध्यमातून मतदारांना मतदानासाठी आवाहन
- सहकारी गृहनिर्माण संस्थांना मतदार नोंदणीसाठी आवाहन
- मतदार जागृतीसाठी मोबाईल कंपन्यांकडून जनहितार्थ एसएमएस
- उद्योजक, बँक व कंपन्यांचा मतदार जागृतीत सहभाग
- हॉटेल्स असोशिएशनचा मतदार जागृतीसाठी सकारात्मक प्रतिसाद
- कम्युनिटी रेडिओ केंद्रांच्या माध्यमातून व्यापक मतदार जागृती
- सोशल मीडियाचा मतदार जागृतीसाठी प्रभावी वापर
- विद्यार्थ्यांसाठी निबंध, पोस्टर्स व शॉर्ट फिल्म स्पर्धेचे आयोजन
- नाटकाच्या मध्यंतरात थिएटरमध्ये मतदार जागृतीची उद्घोषणा



| मतदार जागृती मोहिमांचा तपशील | | |
|---|---|---|
| स्थानिक स्वराज्य संस्था | मतदार नोंदणी | मतदानाचे प्रमाण वाढविणे |
| नगरपरिषदा व नगरपंचायती | ८ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर २०१५<br>१ जुलै ते ३१ ऑगस्ट २०१६ | नोव्हेंबर २०१६ ते जानेवारी २०१७ |
| महानगरपालिका (१०) | ८ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर २०१५<br>१६ सप्टेंबर ते २१ ऑक्टोबर २०१६ | जानेवारी व फेब्रुवारी २०१७ |
| जि.प. (२६) व पं.स. (२९६) | ८ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर २०१५<br>१६ सप्टेंबर ते २१ ऑक्टोबर २०१६ | जानेवारी व फेब्रुवारी २०१७ |
| महानगरपालिका (६) | ८ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर २०१५<br>१६ सप्टेंबर ते २१ ऑक्टोबर २०१६ | साधारणतः एप्रिल २०१७ |

## शासकीय प्रकाशनांचा सहभाग

राज्य शासनाच्या विविध विभागांतर्फे वेगवेगळ्या विषयांशी संबंधित नियतकालिकेत प्रकाशित होतात. याद्वारे आयोगाने मतदार जागृतीसाठी नागरिकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला आहे. 'किशोर' मासिकात लहान मुलांच्या माध्यमातून पालकांना संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. 'शेतकरी', 'आरोग्यपत्रिका', 'शिक्षण संक्रमण' इत्यादी मासिकांमध्येही जनजागृतीपर संदेश/जाहिराती प्रसिद्ध झाल्या आहेत. 'लोकराज्य', 'ऊर्दू लोकराज्य' आणि 'महाराष्ट्र अहेड'चा नोव्हेंबर २०१६ चा अंक निवडणूक विशेषांक म्हणून प्रकाशित करण्यात आला आहे. लोकराज्याच्या विशेषकांचे मा. आयुक्त यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. आयोगाचे सचिव शेखर चन्ने, माहिती व जनसंपर्क विभागाचे सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, संचालक. श्री. अजय आंबेकर, श्री. देवेंद्र भुजबळ आदी म्हणून यावेळी उपस्थित होते.




१४ ऑक्टोबर २०१६
महाराष्ट्र घडवा.
मतदार नोंदणी अभियान
शहादा नगर परिषद,शहादा
ठाणे महानगरपालिका
Your Country needs you to VOTE
REAL PEOPEL ALWAYS VOTE...!!!
अकोला महानगर
DONT FOLLOW MAJORITY
FOLLOW THE RIGHT WAY
Maharashtra Municipal Councils Elections
Do you know the polling dates?
Your vote is your right. Let's vote ethically and make Maharashtra proud.
More information
MM-SECMHA
2016/09/23 Fri
Municipal Corporations, Zilla Parishad / Panchayat Samiti Elections 2017 : Register name as Voter if already not done
मतदान जनजागृती


# आचारसंहितेचे सुधारीत आदेश


राज्य निवडणूक आयोगाने १४ ऑक्टोबर २०१६ रोजी आचारसंहितेसंदर्भातील सुधारीत आदेश निर्गमित केले आहेत. भारतीय संविधानातील तरतुदीनुसार निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी राजकीय पक्ष व उमेदवारांच्या वर्तणुकीकरिता सर्वप्रथम १९६० मध्ये केरळ विधानसभा निवडणुकीच्यावेळी काही मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आली होती. याचा प्रभावी परिणाम लक्षात घेऊन पुढे त्यात आवश्यक त्या सुधारणा करण्यात आल्या.

लोकसभा व विधानसभा निवडणुकांसाठीची आचारसंहिता राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकातही अंमलात आणली आहे. या संदर्भात राज्य निवडणूक आयोगाने २९ डिसेंबर २०११ रोजी आदेश काढले होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात सन २०११ पासून झालेल्या नवीन घडामोडी; तसेच भारत व राज्य निवडणूक आयोगाने नव्याने निर्गमित केलेले विविध आदेश आदी बाबींचा विचार करून राज्य निवडणूक आयोगाने आता नवीन आदेश निर्गमित केले आहेत. त्यामुळे आयोगाचे पूर्वीच २९ डिसेंबर २०११ चे आचारसंहिते संदर्भातील आदेश रद्द करण्यात आले आहेत.

## ■ आचारसंहितेद्वारे विनियमित होणारे विषय

- शांततापूर्ण आणि नियमबद्ध आचरण
- सर्वांना समान संधी
- नागरिकांचा शांततेचा अधिकार
- प्रचाराकरिता पाळावयाची सभ्यता
- निवडणूक विषयक गुन्ह्यांना प्रतिबंध करणे
- शासकीय यंत्रणा व पदाच्या दुरुपयोगास प्रतिबंध करणे




## ■ न्यायालयाचे निकाल व आयोगाच्या आदेशांचे संकलन

राज्य निवडणूक आयोगाकडे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात विविध शंका आणि प्रश्नाबाबत वारंवार विचारणा केली जाते. त्यांचे निरसन करण्याच्यादृष्टीने मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयाचे निर्णय आणि राज्य निवडणूक आयोगाच्या महत्त्वपूर्ण आदेशांचे संकलन असलेले पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे. मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले निर्णय किंवा अभिप्राय मार्गदर्शक ठरतात. त्यामुळे हे पुस्तक संदर्भाकरिता सर्व संबंधितांसाठी निश्चितच उपयुक्त ठरेल.

# महानगरपालिका निवडणूक २०१७ : जागांचा तपशील

| अ. क्र. | महानगरपालिका | लोकसंख्या (२०११) | एकूण जागा | | सर्वसाधारण | | अनुसूचित जाती | | अनुसूचित जमाती | | नागरिकांचा मागासप्रवर्ग | | एकूण प्रभाग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | एकूण | महिला | एकूण | महिला | एकूण | महिला | एकूण | महिला | एकूण | महिला | |
| १ | बृहन्मुंबई | १२४४२३७३ | २२७ | ११४ | १४९ | ७४ | १५ | ८ | २ | १ | ६१ | ३१ | २२७ |
| २ | ठाणे | १८४१४८८ | १३१ | ६६ | ८४ | ४१ | ९ | ५ | ३ | २ | ३५ | १८ | ३३ |
| ३ | उल्हासनगर | ५०६०९८ | ७८ | ३९ | ४३ | २१ | १३ | ७ | १ | ० | २१ | ११ | २० |
| ४ | नाशिक | १४८६०५३ | १२२ | ६१ | ६२ | ३० | १८ | ९ | ९ | ५ | ३३ | १७ | ३१ |
| ५ | पुणे | ३१३२१४३ | १६२ | ८१ | ९४ | ४७ | २२ | ११ | २ | १ | ४४ | २२ | ४१ |
| ६ | पिंपरी–चिंचवड | १७२७६९२ | १२८ | ६४ | ७० | ३४ | २० | १० | ३ | २ | ३५ | १८ | ३२ |
| ७ | सोलापूर | ९५११५८ | १०२ | ५१ | ५७ | २८ | १५ | ८ | २ | १ | २८ | १४ | २६ |
| ८ | अकोला | ५३७१३७ | ८० | ४० | ४२ | २१ | १४ | ७ | २ | १ | २२ | ११ | २० |
| ९ | अमरावती | ६४७०५७ | ८७ | ४४ | ४७ | २३ | १५ | ८ | २ | १ | २३ | १२ | २२ |
| १० | नागपूर | २४४७४९४ | १५१ | ७६ | ६८ | ३४ | ३० | १५ | १२ | ६ | ४१ | २१ | ३८ |
| | एकूण | २५७१९०९३ | १२६८ | ६३६ | ७१६ | ३५३ | १७१ | ८८ | ३८ | २० | ३४३ | १७५ | ४९० |
| ११ | भिवंडी–निजामपूर | ७०९६६५ | ९० | ४५ | ६२ | ३० | ३ | २ | १ | १ | २४ | १२ | २३ |
| १२ | मालेगाव | ५९०९९८ | ८४ | ४२ | ५५ | २७ | ४ | २ | २ | १ | २३ | १२ | २१ |
| १३ | चंद्रपूर | ३२०३७९ | ६६ | ३३ | ३० | १४ | १३ | ७ | ५ | ३ | १८ | ९ | १७ |
| १४ | लातूर | ३८२९४० | ७० | ३५ | ३८ | १८ | १२ | ६ | १ | १ | १९ | १० | १८ |
| १५ | परभणी | ३०७१७० | ६५ | ३३ | ३८ | २० | ८ | ४ | १ | ० | १८ | ९ | १६ |
| १६ | पनवेल | ५०९९०१ | ७८ | ३९ | ४९ | २४ | ६ | ३ | २ | १ | २१ | ११ | २० |
| | एकूण | २८२१०५३ | ४५३ | २२७ | २७२ | १३३ | ४६ | २४ | १२ | ७ | १२३ | ६३ | ११५ |

# २०१२ च्या महानगरपालिका निवडणुकांचा तपशील

| अ. क्र. | महानगरपालिका | मागील निवडणूक | मुदत समाप्ती | मतदानाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | बृहन्मुंबई | १६.०२.२०१२ | ०८.०३.२०१७ | ४४.७५ |
| २ | ठाणे | १६.०२.२०१२ | ०५.०३.२०१७ | ५३.२६ |
| ३ | उल्हासनगर | १६.०२.२०१२ | ०३.०४.२०१७ | ४२.१९ |
| ४ | नाशिक | १६.०२.२०१२ | १४.०३.२०१७ | ५७.१९ |
| ५ | पुणे | १६.०२.२०१२ | १४.०३.२०१७ | ५०.९२ |
| ६ | पिंपरी–चिंचवड | १६.०२.२०१२ | १२.०३.२०१७ | ५४.८४ |
| ७ | सोलापूर | १६.०२.२०१२ | ०५.०३.२०१७ | ५२.३६ |
| ८ | अमरावती | १६.०२.२०१२ | ०८.०३.२०१७ | ५४.४२ |
| ९ | अकोला | १६.०२.२०१२ | ०८.०३.२०१७ | ५६.०८ |
| १० | नागपूर | १६.०२.२०१२ | ०४.०३.२०१७ | ५२ |
| एकूण सरासरी मतदान | | | | ५१.८ |
| ११ | भिवंडी–निजामपूर | १५.०४.२०१२ | १०.०६.२०१७ | ४९.६१ |
| १२ | मालेगाव | १५.०४.२०१२ | १४.०६.२०१७ | ६३.११ |
| १३ | लातूर | १५.०४.२०१२ | २०.०५.२०१७ | ५७.०२ |
| १४ | परभणी | १५.०४.२०१२ | १५.०५.२०१७ | ५७.९१ |
| १५ | चंद्रपूर | १५.०४.२०१२ | २९.०४.२०१७ | ५७.७१ |
| एकूण सरासरी मतदान | | | | ५७.७२ |
| १६ | मिरा–भाईंदर | १२.०८.२०१२ | २७.०८.२०१७ | ४६.९९ |
| १७ | नांदेड वाघाळा | १४.१०.२०१२ | ३०.१०.२०१७ | ५६.६२ |
| एकूण सरासरी मतदान | | | | ४९.२३ |
| एकूण १ ते १७ सरासरी मतदान | | | | ५२.७१ |

# २०१२ च्या महानगरपालिका निवडणुकांचे निकाल

| अ. क्र. | महानगरपालिकेचे नाव | एकूण जागा | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या | निकाल घोषित झालेल्या जागांची संख्या | भारतीय जनता पार्टी | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया | नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी | इंडियन नॅशनल कॉंग्रेस | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सिस्ट) | बहुजन समाज पार्टी | शिवसेना | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्ष | राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत पक्ष | अपक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मतदानाची दिनांक १६ फेब्रुवारी २०१२ | | | | | | | | | | | | | | | |
| १ | बृहन्मुंबई | २२७ | २२३२ | २२७ | ३१ | ० | १३ | ५२ | ० | ० | ७५ | २८ | ९ | ४ | १५ |
| २ | ठाणे | १३० | ७७८ | १३० | ८ | ० | ३४ | १८ | ० | २ | ५३ | ७ | ० | १ | ७ |
| ३ | उल्हासनगर | ७८ | ५०४ | ७८ | ११ | ० | २० | ८ | ० | २ | १९ | १ | ० | ११ | ६ |
| ४ | नाशिक | १२२ | ९२९ | १२२ | १४ | ० | २० | १५ | ३ | ० | १९ | ४० | ० | ५ | ६ |
| ५ | पुणे | १५२ | ११७७ | १५२ | २६ | ० | ५१ | २८ | ० | ० | १५ | २९ | ० | २ | १ |
| ६ | पिंपरी-चिंचवड | १२८ | ८८२ | १२८ | ३ | ० | ८३ | १४ | ० | ० | १४ | ४ | ० | १ | ९ |
| ७ | सोलापूर | १०२ | ५५७ | १०२ | २५ | ० | १६ | ४५ | ३ | ३ | ८ | ० | ० | १ | १ |
| ८ | अमरावती | ८७ | ७२४ | ८७ | ७ | ० | १७ | २५ | ० | ६ | १० | ० | १ | १३ | ८ |
| ९ | अकोला | ७३ | ५१७ | ७३ | १८ | ० | ५ | १८ | ० | ० | ८ | १ | ३ | ९ | ११ |
| १० | नागपूर | १४५ | १२३२ | १४५ | ६२ | ० | ६ | ४१ | ० | १२ | ६ | २ | ० | ६ | १० |
| | एकूण | १२४४ | ९५३२ | १२४४ | २०५ | ० | २६५ | २६४ | ६ | २५ | २२७ | ११२ | १३ | ५३ | ७४ |
| मतदानाचा दिनांक १५ एप्रिल २०१२ | | | | | | | | | | | | | | | |
| ११ | भिवंडी-निजामपूर | ९० | ६३२ | ९० | ८ | ० | ९ | २६ | ० | ० | १६ | ० | १६ | ८ | ७ |
| १२ | मालेगाव | ८० | ४७१ | ८० | ० | ० | ८ | २५ | ० | ० | ११ | २ | ५ | २० | ९ |
| १३ | लातूर | ७० | ४१८ | ७० | ० | ० | १३ | ४९ | ० | ० | ६ | ० | ० | २ | ० |
| १४ | परभणी | ६५ | ४२३ | ६५ | २ | ० | ३० | २३ | ० | ० | ८ | ० | ० | ० | २ |
| १५ | चंद्रपूर | ६६ | ४५८ | ६६ | १८ | ० | ४ | २६ | ० | १ | ५ | १ | ० | १ | १० |
| | एकूण | ३७१ | २४०२ | ३७१ | २८ | ० | ६४ | १४९ | ० | १ | ४६ | ३ | २१ | ३१ | २८ |
| मतदानाचा दिनांक १२.ऑगस्ट २०१२ | | | | | | | | | | | | | | | |
| १६ | मिरा-भाईंदर | ९५ | ५१६ | ९४ | २९ | ० | २७ | १९ | ० | ० | १४ | १ | ० | ३ | १ |
| मतदानाचा दिनांक १४ ऑक्टोबर २०१२ | | | | | | | | | | | | | | | |
| १७ | नांदेड वाघाळा | ८१ | ५१० | ८१ | २ | ० | १० | ४१ | ० | ० | १४ | ० | ० | १३ | १ |
| | एकूण | १७९१ | १२९६० | १७९० | २६४ | ० | ३६६ | ४७३ | ६ | २६ | ३०१ | ११६ | ३४ | १०० | १०४ |

# जि. प. आणि पं. स. निवडणुकांचा तपशील

| अ. क्र. | जिल्हा परिषद | मागील निवडणूक | जिल्हा परिषदेची मुदत समाप्ती | पंचायत समित्यांची मुदत समाप्ती | जि.प. आणि पं.स. ची मतदानाची टक्केवारी | फेब्रुवारी २०१७ मध्ये होणाऱ्या निवडणुकांचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | एकूण लोकसंख्या (२०११) | एकूण जागा | पंचायत समितींची संख्या | पंचायत समितींच्या जागा |
| १ | रायगड | ०७.०२.२०१२ | २०.०३.२०१७ | १३.०३.२०१७ | ६९.७५ | १८०७९५० | ५९ | १५ | ११८ |
| २ | रत्नागिरी | ०७.०२.२०१२ | २०.०३.२०१७ | १३.०३.२०१७ | ६३.५२ | १३९६३९१ | ५५ | ९ | ११० |
| ३ | सिंधुदुर्ग | ०७.०२.२०१२ | २०.०३.२०१७ | १३.०३.२०१७ | ६७.१४ | ७३८४४७ | ५० | ८ | १०० |
| ४ | नाशिक | ०७.०२.२०१२ | २०.०३.२०१७ | १३.०३.२०१७ | ६४.२३ | ३५५३८६१ | ७३ | १५ | १४६ |
| ५ | जळगाव | ०७.०२.२०१२ | २०.०३.२०१७ | १३.०३.२०१७ | ६३.८५ | २९०१६३८ | ६७ | १५ | १३४ |
| ६ | अहमदनगर | ०७.०२.२०१२ | २०.०३.२०१७ | १३.०३.२०१७ | ६५.०९ | ३६०८९३२ | ७३ | १४ | १४६ |
| ७ | पुणे | ०७.०२.२०१२ | २०.०३.२०१७ | १३.०३.२०१७ | ६४.९१ | ३८४७३३२ | ७५ | १३ | १५० |
| ८ | सातारा | ०७.०२.२०१२ | २०.०३.२०१७ | १३.०३.२०१७ | ६६.५६ | २५१८१४३ | ६४ | ११ | १२८ |
| ९ | सांगली | ०७.०२.२०१२ | २०.०३.२०१७ | १३.०३.२०१७ | ६९.१३ | २०१५८०० | ६० | १० | १२० |
| १० | सोलापूर | ०७.०२.२०१२ | २०.०३.२०१७ | १३.०३.२०१७ | ६३.२४ | २९२२२२१ | ६८ | ११ | १३६ |
| ११ | कोल्हापूर | ०७.०२.२०१२ | २०.०३.२०१७ | १३.०३.२०१७ | ७५.२४ | २८५७२२७ | ६७ | १२ | १३४ |
| १२ | औरंगाबाद | ०७.०२.२०१२ | २०.०३.२०१७ | १३.०३.२०१७ | ६८.१७ | २२०७४६७ | ६२ | ९ | १२४ |
| १३ | जालना | ०७.०२.२०१२ | २०.०३.२०१७ | १३.०३.२०१७ | ७०.२५ | १५२४३०९ | ५६ | ८ | ११२ |
| १४ | परभणी | ०७.०२.२०१२ | २०.०३.२०१७ | १३.०३.२०१७ | ७१.३२ | १२५१९९४ | ५४ | ९ | १०८ |
| १५ | हिंगोली | ०७.०२.२०१२ | २०.०३.२०१७ | १३.०३.२०१७ | ७२.२७ | ९७३५८४ | ५२ | ५ | १०४ |
| १६ | बीड | ०७.०२.२०१२ | २०.०३.२०१७ | १३.०३.२०१७ | ६६.९ | २०३५७१८ | ६० | ११ | १२० |
| १७ | नांदेड | ०७.०२.२०१२ | २०.०३.२०१७ | १३.०३.२०१७ | ६७.४६ | २४१६१८४ | ६३ | १६ | १२६ |
| १८ | उस्मानाबाद | ०७.०२.२०१२ | २०.०३.२०१७ | १३.०३.२०१७ | ६३.४७ | १३४५८३१ | ५५ | ८ | ११० |
| १९ | लातूर | ०७.०२.२०१२ | २०.०३.२०१७ | १३.०३.२०१७ | ६५.२९ | १७८०६६१ | ५८ | १० | ११६ |
| २० | अमरावती | ०७.०२.२०१२ | २०.०३.२०१७ | १३.०३.२०१७ | ६५.३९ | १८१३७०९ | ५९ | १० | ९८ |
| २१ | बुलडाणा | ०७.०२.२०१२ | २०.०३.२०१७ | १३.०३.२०१७ | ६९.६८ | २०३३१२६ | ६० | १३ | १२० |
| २२ | यवतमाळ | ०७.०२.२०१२ | २०.०३.२०१७ | १३.०३.२०१७ | ६४.७२ | २०९१७३३ | ६१ | १६ | १२२ |
| २३ | नागपूर | ०७.०२.२०१२ | २०.०३.२०१७ | १३.०३.२०१७ | ६२.७९ | १७३२३१० | ५८ | १३ | ११६ |
| २४ | वर्धा | ०७.०२.२०१२ | २०.०३.२०१७ | १३.०३.२०१७ | ६८.९९ | ९३७६५८ | ५२ | ८ | १०४ |
| २५ | चंद्रपूर | ०७.०२.२०१२ | २०.०३.२०१७ | १३.०३.२०१७ | ७१.४६ | १४७१२०७ | ५६ | १५ | ११२ |
| २६ | गडचिरोली | ०७.०२.२०१२ | २०.०३.२०१७ | १३.०३.२०१७ | ६९.८९ | ८८६४८३ | ५१ | १२ | १०२ |
| | एकूण | | | | ६७.३४ | ५२६६९९१६ | १५६८ | २९६ | ३११६ |

# २०१२ च्या जिल्हा परिषद निवडणुकांचे निकाल

| अ. क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | एकूण जागा | भारतीय जनता पार्टी | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया | नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी | इंडियन नॅशनल कॉंग्रेस | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सिस्ट) | बहुजन समाज पार्टी | शिवसेना | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्ष | राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत पक्ष | अपक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रायगड | ६२ | १ | ० | २० | ७ | ० | ० | १४ | ० | ० | १९ | १ |
| २ | रत्नागिरी | ५७ | ७ | ० | १९ | ३ | ० | ० | २५ | ० | ० | ० | ३ |
| ३ | सिंधुदुर्ग | ५० | ३ | ० | १० | ३३ | ० | ० | ४ | ० | ० | ० | ० |
| ४ | नाशिक | ७३ | ४ | ० | २७ | १४ | ३ | ० | १७ | ३ | ० | १ | ४ |
| ५ | जळगाव | ६८ | २३ | ० | २० | १० | ० | ० | १५ | ० | ० | ० | ० |
| ६ | अहमदनगर | ७५ | ६ | ० | ३२ | २८ | १ | ० | ६ | ० | ० | ० | २ |
| ७ | पुणे | ७५ | ३ | ० | ४२ | ११ | ० | ० | १२ | १ | ० | ५ | १ |
| ८ | सातारा | ६७ | ० | ० | ३९ | २१ | ० | ० | ० | ० | ० | ४ | ३ |
| ९ | सांगली | ६२ | ० | ० | ३३ | २३ | ० | ० | ० | ० | ० | ४ | २ |
| १० | सोलापूर | ६८ | ० | ० | ३३ | १८ | ० | ० | ० | ० | १ | १२ | ४ |
| ११ | कोल्हापूर | ६९ | १ | ० | १६ | ३१ | ० | ० | ६ | ० | ० | १५ | ० |
| १२ | औरंगाबाद | ६० | ६ | ० | १० | १६ | ० | ० | १७ | ८ | ० | ० | ३ |
| १३ | जालना | ५५ | १५ | ० | १६ | ३ | ० | ० | १५ | १ | ० | ० | ५ |
| १४ | परभणी | ५२ | २ | ० | २५ | ८ | ० | ० | ११ | ० | ० | २ | ४ |
| १५ | हिंगोली | ५० | ० | ० | १० | ९ | ० | ० | २७ | ० | ० | ० | ४ |
| १६ | बीड | ५९ | २० | ० | ३० | ० | १ | ० | २ | ० | ० | ५ | १ |
| १७ | नांदेड | ६३ | ४ | ० | १८ | २५ | ० | ० | ९ | ० | ० | ६ | १ |
| १८ | उस्मानाबाद | ५४ | २ | ० | १९ | २० | ० | ० | १३ | ० | ० | ० | ० |
| १९ | लातूर | ५८ | ८ | ० | ९ | ३५ | ० | ० | ५ | १ | ० | ० | ० |
| २० | अमरावती | ५९ | ९ | ० | २५ | ७ | ० | २ | ७ | ० | ० | ८ | १ |
| २१ | बुलडाणा | ५९ | ४ | ० | १३ | २२ | ० | ० | ११ | १ | २ | २ | ४ |
| २२ | यवतमाळ | ६२ | ४ | ० | २१ | २३ | ० | ० | १२ | १ | ० | ० | १ |
| २३ | नागपूर | ५९ | २२ | ० | ७ | १९ | ० | १ | ८ | ० | ० | ० | २ |
| २४ | वर्धा | ५१ | १७ | ० | ८ | १७ | ० | ० | १ | ० | ० | ३ | ५ |
| २५ | चंद्रपूर | ५७ | १८ | ० | ७ | २१ | ० | १ | २ | १ | ० | ७ | ० |
| २६ | गडचिरोली | ५१ | ८ | १ | ९ | १४ | ० | ० | २ | ० | ० | ७ | १० |
| | एकूण | १५७५ | १८७ | १ | ५१८ | ४३८ | ५ | ४ | २४१ | १७ | ३ | १०० | ६१ |

# २०१२ च्या पंचायत समिती निवडणुकांचे निकाल

| अ. क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | पंचायत समित्यांची संख्या | एकूण जागा | भारतीय जनता पार्टी | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया | नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी | इंडियन नॅशनल काँग्रेस | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सिस्ट) | बहुजन समाज पार्टी | शिवसेना | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्ष | राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत पक्ष | अपक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रायगड | १५ | १२४ | २ | १ | ३५ | २२ | ० | ० | २९ | ० | ० | ३३ | २ |
| २ | रत्नागिरी | ९ | ११४ | ६ | ० | ३८ | ८ | ० | ० | ५८ | ० | ० | ० | ४ |
| ३ | सिंधुदुर्ग | ८ | १०० | ६ | ० | २३ | ५८ | ० | ० | १० | ० | ० | ० | ३ |
| ४ | नाशिक | १५ | १४६ | ८ | ० | ५३ | ३० | ५ | ० | २८ | ८ | ० | ५ | ९ |
| ५ | जळगाव | १५ | १३६ | ४४ | ० | ४२ | १७ | ० | ० | २९ | १ | ० | ० | ३ |
| ६ | अहमदनगर | १४ | १५० | १५ | ० | ६० | ५२ | ० | ० | १८ | १ | ० | ० | ४ |
| ७ | पुणे | १३ | १५० | ९ | ० | ७५ | २३ | ० | ० | १९ | ४ | ० | १३ | ७ |
| ८ | सातारा | ११ | १३४ | ० | ० | ८१ | ३९ | ० | ० | १ | ० | ० | ७ | ६ |
| ९ | सांगली | १० | १२४ | १ | ० | ७० | ४० | ० | ० | ० | ० | ० | ७ | ६ |
| १० | सोलापूर | ११ | १३६ | ७ | ० | ६१ | २६ | ० | ० | १ | ० | ३२ | ० | ९ |
| ११ | कोल्हापूर | १२ | १३८ | १ | ० | ३६ | ५२ | ० | ० | ७ | ० | २ | ३२ | ८ |
| १२ | औरंगाबाद | ९ | १२० | १० | ० | २४ | ३१ | ० | ० | ३३ | ११ | ० | ० | ११ |
| १३ | जालना | ८ | ११० | २५ | ० | ३५ | ११ | ० | ३ | ३१ | ३ | ० | ० | २ |
| १४ | परभणी | ९ | १०४ | ४ | १ | ५३ | १२ | ० | ० | १९ | ० | ० | २ | १३ |
| १५ | हिंगोली | ५ | १०० | ७ | ० | १२ | २९ | ० | १ | ४४ | २ | ० | ० | ५ |
| १६ | बीड | ११ | ११८ | ४३ | ० | ५५ | १ | ० | ० | ६ | १ | ० | १० | २ |
| १७ | नांदेड | १६ | १२६ | ६ | ० | ३० | ५० | १ | ० | २१ | १ | ० | १६ | १ |
| १८ | उस्मानाबाद | ८ | १०८ | ७ | ० | ४० | ३८ | ० | ० | २३ | ० | ० | ० | ० |
| १९ | लातूर | १० | ११६ | २३ | ० | १९ | ६५ | ० | ० | ८ | १ | ० | ० | ० |
| २० | अमरावती | १० | ८८ | १० | १ | १२ | २९ | ० | ४ | १२ | ० | ० | १६ | ४ |
| २१ | बुलडाणा | १३ | ११८ | १९ | ० | २० | ४१ | १ | ० | २१ | ३ | ९ | १ | ३ |
| २२ | यवतमाळ | १६ | १२४ | १० | ० | ३७ | ५१ | ० | १ | २० | ३ | ० | ० | २ |
| २३ | नागपूर | १३ | ११८ | ४५ | ० | १७ | ३१ | ० | २ | १७ | ० | ० | १ | ५ |
| २४ | वर्धा | ८ | १०२ | ३३ | ० | १७ | ३३ | ० | २ | ५ | ० | ० | २ | १० |
| २५ | चंद्रपूर | १५ | ११४ | ३१ | ० | १४ | ४६ | ० | ० | २ | १ | ० | १८ | २ |
| २६ | गडचिरोली | १२ | १०२ | १६ | ० | १९ | ३२ | ० | १ | ३ | ० | ० | ० | ३१ |
| | एकूण | २९६ | ३१२० | ३८८ | ३ | ९७८ | ८६७ | ७ | १४ | ४६५ | ४० | ४३ | १६३ | १५२ |



देगलूर नगरपरिषदेच्या निवडणुकीत मतदानाचे
प्रमाण वाढविण्यासाठी जनजागृती



नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांमध्ये मतदानाचे
प्रमाण वाढविण्यासाठी पथनाट्य सादर करताना





## राज्य निवडणूक आयोग

पहिला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०००३२
दूरध्वनी: ०२२ २२०४६९०९

ई-मेल: mahasecpro@gmail.com, sec.mh@gov.in
संकेतस्थळ: https://mahasec.maharashtra.gov.in
ब्लॉग: https://mahasecnews.blogspot.in